रविवार दि. २४ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## गडचिरोली ते मुंबई उद्योग, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणपूरक विकासाला गती – उपमुख्यमंत्री

**मुंबई । वृत्तसेवा**

विकसित भारत २०४७ च्या दिशेने वाटचाल करताना महाराष्ट्र वेगाने पुढे जात असून, मुंबईपासून गडचिरोलीतील सुरजागडपर्यंत विकासाचा नवा एक्सप्रेसवे उभारण्यात येणार आहे. उद्योग, आधुनिक पायाभूत सुविधा, वेगवान दळणवळण, कौशल्य विकास, गृहनिर्माण आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. या व्यापक विकास आराखड्यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

दि हिंदू कॉन्क्लेव्ह' मध्ये मुंबई ते सुरजागड - समृद्धीचा महामार्ग या विषयावर बोलताना त्यांनी राज्यातील पायाभूत सुविधा, उद्योग, गृहनिर्माण, परिवहन, पर्यावरण आणि गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांतील विकासाचा विस्तृत आढावा मांडला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई हे देशाचे आर्थिक केंद्र आणि गडचिरोलीसारखे दुर्गम भाग हे नैसर्गिक व औद्योगिक संपत्तीने



समृद्ध असल्याचे सांगत त्यांनी राज्यातील विकास केवळ महानगरांपुरता मर्यादित न ठेवता तो ग्रामीण, आदिवासी आणि मागास भागांपर्यंत पोहोचवण्यावर शासनाचा भर असल्याचे स्पष्ट केले. समृद्धी महामार्ग, मेट्रो जाळे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर, स्टील प्रकल्प आणि कौशल्य विकास केंद्रांमुळे राज्यात रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळाली असून कोस्ट टू फॉरेस्ट असा विकासाचा प्रवास गेल्या काही वर्षांत घडवून आणला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गडचिरोलीचा पालकमंत्री असताना नक्षलग्रस्त भागांमध्ये जाऊन स्थानिक नागरिक, आदिवासी समाज आणि पोलिसांशी संवाद साधत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रक्षाबंधन आणि दिवाळीसारखे सणही जवानांसोबत गडचिरोलीत साजरे केल्याचे सांगत त्यांनी, दुर्गम भागाचा विकास करायचा असेल, तर तेथील समाजाशी भावनिक नाते जोडणे आवश्यक असते असे सांगितले.

पायाभूत सुविधांसह रोजगारनिर्मितीवर भर गडचिरोलीत रस्ते, पूल, रुग्णवाहिका, ऑक्सिजन प्लांट आणि प्रशासनासाठी आवश्यक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. मात्र, केवळ सुविधा नव्हे तर उद्योग आणि रोजगार निर्माण करणे ही सरकारची प्रमुख भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

टाटा टेक्नॉलॉजी कौशल्य विकास केंद्र टाटा समूहासोबत चर्चा करून स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकासाची संकल्पना पुढे आणण्यात आली. त्यातून १७० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून 'टाटा टेक्नॉलॉजी कौशल्य विकास केंद्र' सुरू करण्यात आले. गडचिरोलीत अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त हे केंद्र दरवर्षी सुमारे ४,८०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजक निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नक्षलवादावर नियंत्रण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वामुळे *(पान २ वर)*

## देऊळगाव राजा–जालना मार्गावर गोवंश वाहतूक करणारी दोन वाहने पकडली

### गोरक्षक दल व बजरंग दलाची कारवाई; जनावरे आणि वाहने चंदनझिरा पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

देऊळगावराजा येथील बाजारातून जालना शहराच्या दिशेने गोवंशाची वाहतूक करणारी दोन वाहने गोरक्षक दल आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी अडवून चंदनझिरा पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. या कारवाईमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पकडण्यात आलेल्या



वाहनांमधून पाच ते सहा जनावरांची वाहतूक होत असल्याचा दावा करण्यात आला असून, ही जनावरे जालना शहरातील कत्तलखान्याकडे नेली जात असल्याचा आरोप बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास गोरक्षक दल आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना देऊळगावराजा बाजारातून जालना शहराकडे गोवंशाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी संबंधित मार्गावर लक्ष ठेवून संशयित दोन वाहनांचा पाठलाग केला. वाहने थांबवून तपासणी केल्यानंतर त्यामध्ये *(पान २ वर)*

### हद्दपार गुन्हेगाराला गावठी पिस्तुलासह अटक; हसनाबाद पोलिसांची धडक कारवाई

## एसपी तेघबीर सिंह संधू यांच्या विशेष मोहिमेला मोठे यश; २५ हजारांचे अग्रीशस्त्र जप्त, हद्दपारी आदेशाचे उल्लंघन उघड

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली हसनाबाद पोलिसांनी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या एका सराईत गुन्हेगाराला गावठी पिस्तुल आणि मॅग्झिनसह रंगेहात



अटक केली. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली असून, पोलिसांच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भोकरदन तालुक्यातील लतीफपूर येथील रहिवासी शेख जुनेद शेख आरेफ (वय २५ वर्षे) हा विविध गुन्ह्यांमुळे जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आला होता. मात्र, हद्दपारी आदेशाचे उल्लंघन करून तो आपल्या नातेवाईकाला भेटण्यासाठी लतीफपूर येथे आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्याकडे अग्नीशस्त्र असल्याचाही संशय व्यक्त करण्यात *(पान २ वर)*

## पिक्स आर्ट पद्धारे बनवले बनावट नियुक्तीपत्र

### बेरोजगार तरुणाची फसवणूक करणारे दोघे

**जालना । प्रतिनिधी**

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उमेश विजयकुमार जाधव (रा. खांडवी, ता. परतूर, जि. जालना) या सुशिक्षित बेरोजगाराला आरोपींनी गाठले. वन खात्यात वजनदार ओळख असून थेट सरकारी नोकरी लावून देतो, असे आमिष त्यांनी उमेशला दाखवले. या नोकरीसाठी तब्बल १५ लाख रुपयांचा सौदा ठरला होता.



विश्वास संपादन करण्यासाठी आरोपी राहुल कदम याने त्याच्या मोबाईलमधील 'पिक्स आर्ट' या फोटो एडिटिंग प्लिकेशनचा वापर करून वन विभागाचे हुबेहूब दिसणारे 'बनावट प्रशिक्षण आदेश' (ऋज्ञश ढीरळपळपस जीवशी) तयार केले. त्यानंतर निलेश झाटे याने ते आदेश तक्रारदार उमेश यांच्या व्हॉट्सपवर पाठवले. सरकारी आदेश आल्याचे पाहून उमेशचा विश्वास बसला आणि त्यांनी पहिला टप्पा म्हणून आरोपींना ४ लाख रुपये रोकड दिली. मात्र, काही दिवसांनी हे आदेश बनावट असल्याचे लक्षात येताच, आपली फसवणूक झाल्याचे समजून उमेश जाधव यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात धाव घेऊन गुन्हा दाखल केला.

**तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे 'लोकेशन' ट्रेस**

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला (डउइ) आरोपींचा तात्काळ शोध घेण्याचे आदेश दिले. एलसीबीचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सायबर सेलच्या मदतीने आरोपींच्या मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण (Technical -nalysis) सुरू केले.

तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी जालन्यातील नाव्हा चौफुली परिसरात येणार असल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी सापळा रचून दोघांना बेड्या ठोकल्या.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे:**

निलेश गोविंदा झाटे (वय २९ वर्षे, रा. वसाली, ता. पातूर, जि. अकोला, राहुल गजानन कदम (वय २६ वर्षे, रा. जनुना, ता. मेहकर, जि. बुलढाणा) ३ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी वन विभागात *(पान २ वर)*

## मुख्य रस्त्यावरील ओटे आणि शेडवर चालला 'जेसीबी'

**जालना । प्रतिनिधी**

सुभद्रा नगर आणि वैद्यकीय महाविद्यालय रस्ता हा शहरातील वर्दळीचा भाग मानला जातो. या परिसरात अनेकांनी मुख्य रस्त्यावर आणि नाल्यांवर ओटे, पायऱ्या आणि लोखंडी तसेच पत्र्यांचे शेड उभारून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले होते. यामुळे या भागातील वाहतुकीला अडथळा निर्माण होत होताच, सोबतीला नाल्या तुंबल्यामुळे परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले होते.

आज सकाळपासूनच मनपाच्या पथकाने या परिसरात धडक कारवाई सुरू केली. यामध्ये रस्त्याला अडथळा ठरणारे आणि घरासमोरील अनधिकृत



ओटे, पायऱ्या आणि शेड तोडण्यात आले. तसेच नाल्यांवर केलेले पक्के बांधकाम हटवून नाला कचरा व ढिगाऱ्यातून पूर्णपणे मोकळा करण्यात आला.

**कडेकोट पोलीस बंदोबस्तात कारवाई**

कारवाई दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाचे चोख सहकार्य घेण्यात आले होते. मनपाने ही कारवाई जलद गतीने करण्यासाठी:

जेसीबी, टिप्पर आणि विशेष पोलीस पथकाचा वापर केला. अतिक्रमण धारकांकडून काही प्रमाणात विरोध करण्याचा प्रयत्न झाला, मात्र पोलीस बंदोबस्त आणि मनपा अधिकाऱ्यांच्या कडक भूमिकेमुळे *(पान २ वर)*

### जालना जिल्हाधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण आश्वासन

## शेती कामांसाठी शेतकऱ्यांना आणि वाहनधारकांना कॅनमध्ये डिझेल मिळणार

**जालना । प्रतिनिधी**

शेती मशागतीच्या ऐन हंगामात डिझेलच्या टंचाईमुळे आणि कॅनमध्ये डिझेल देण्यावर असलेल्या बंदीमुळे अडचणीत सापडलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आणि वाहनधारकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ट्रॅक्टर, जेसीबी, पोकलेन यांसारख्या शेतीशी निगडित वाहनांसाठी पंपावर कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासन जालना जिल्हाधिकारी श्रीमती आसिमा मित्तल यांनी दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने माजी



मंत्री व आमदार मा. राजेशजी टोपे यांच्या सूचनेवरून जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या संदर्भातील मागण्यांचे निवेदन सादर केले.

शेतकऱ्यांची गैरसोय आणि शिष्टमंडळाची भूमिका

सध्या शेती मशागतीचा हंगाम जोरात सुरू आहे. अशा वेळी शेतात काम करणाऱ्या ट्रॅक्टर, जेसीबी किंवा पोकलेन सारख्या मोठ्या वाहनांना थेट पेट्रोल पंपावर घेऊन जाणे अनेकदा अशक्य किंवा अत्यंत गैरसोयीचे ठरते. मात्र, प्रशासनाने कॅनमध्ये डिझेल देण्यावर बंदी घातल्यामुळे ट्रॅक्टर व इतर वाहनधारकांना आपली कामे अर्धवट सोडून पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत होते.

हा निर्णय शेतकऱ्यांवर अन्याय करणारा असून यामुळे शेतीची कामे रखडत असल्याकडे शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. तसेच, जालना जिल्ह्यासाठी डिझेल आणि पेट्रोलचा वाढीव कोटा मंजूर करण्यात यावा, अशीही आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक निर्णय आणि अटी

शिष्टमंडळाने मांडलेली बाजू आणि शेतकऱ्यांची होणारी अडचण *(पान २ वर)*

## महावितरणच्या मनमानी कारभाराला चपराक; ग्राहकाला मोठा दिलासा

**जालना । प्रतिनिधी**

जालना येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात महावितरणच्या मनमानी कारभाराला चपराक लगावली आहे. सरासरीपेक्षा अनेक पटींनी जास्त वीज बिल पाठवून ग्राहकाला मानसिक आणि आर्थिक त्रास दिल्याप्रकरणी आयोगाने महावितरणला जबाबदार धरले आहे. आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती अपर्णा हेमंत काटे, सदस्य श्री. उदय दत्त दळवी आणि श्री. संतोष चागदेव निकुले यांच्या खंडपीठाने तक्रारदार रामेश्वर बंडीराम ईडाळकर यांच्या बाजूने निकाल दिला असून, महावितरणने




जारी केलेली सर्व सदोष वीज देयके रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात, मधुवन कॉलनी, जुना जालना येथील रहिवासी रामेश्वर ईडाळकर यांना महावितरणकडून अचानक २३,५७० रुपयांचे अवास्तव वीज बिल आले होते, तर त्यांचे सरासरी मासिक बिल केवळ ५०० रुपयांच्या आसपास होते. या चुकीच्या बिलासंदर्भात त्यांनी महावितरणकडे तक्रार केली होती. अधिकाऱ्यांनी केलेल्या स्थळ पाहणी अहवालातही केवळ एकाच खोलीत विजेचा वापर होत असून बिल सदोष असल्याचे नमूद केले होते. मात्र, त्यानंतरही महावितरणने बिल दुरुस्त न करता उलट वीज कनेक्शन कापण्याची धमकी देऊन बिल भरण्यासाठी दबाव आणला. या त्रासाला कंटाळून ईडाळकर यांनी ग्राहक आयोगात धाव घेतली. तक्रारदाराच्या वतीने युक्तिवाद करताना महेश धन्नावत यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की, महावितरणने केवळ चुकीचे बिलच दिले नाही, तर स्वतःच्या अधिकाऱ्यांच्या अहवालानंतरही त्यात सुधारणा केली नाही. ग्राहकाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणे आणि वीज कापण्याची धमकी देणे ही सेवा त्रुटी असून यामुळे अर्जदाराला प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला आहे. ॲड .धन्नावत यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आयोगाने महावितरणला सेवेत *(पान २ वर)*

# संपादकी...

## नाशिक जिल्हा गुन्हेगारांचा बालेकिल्ला ?

नाशिकला गुन्हेगारांचा बालेकिल्ला होण्यापासून वाचवणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नाशिककरांची जबाबदारी आहे. नाशिक जिल्हा गुन्हेगारांचा बालेकिल्ला होऊ द्यायचा नसेल तर तातडीने पावलं उचलायला हवीत.

हाराष्ट्राची धार्मिक राजधानी, द्राक्षांचे माहेरघर, पवित्र गोदावरीच्या तटावर वसलेले नाशिक हे शहर आणि हा जिल्हा गेल्या काही महिन्यांत एका वेगळ्याच कारणाने राज्यभर चर्चेचा विषय बनला आहे. भोंदूबाबाचे थरारक प्रकरण, टीसीएस कार्यालयातील लैंगिक छळ आणि धर्मांतराचे षडयंत्र आणि आता नीट पेपरफुटीचे नाशिक कनेक्शन या तिन्ही प्रकरणांनी नाशिकची प्रतिमा मलीन केली. हा केवळ योगायोग आहे का, की नाशिक जिल्हा खरोखरच गुन्हेगारांचा बालेकिल्ला बनत आहे? नाशिक जिल्ह्यातील तीन पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाच्या या घटनांमध्ये एक समान धागा आहे. सुरक्षित असण्याचा दावा करणाऱ्या जागांमध्येच सर्वात मोठा धोका दडलेला होता. देवाच्या नावावर घरात, कामाच्या ठिकाणी आणि परीक्षा केंद्रात गुन्हेगारांनी प्रत्येक विश्वासाचा दुरुपयोग केला. हे तीन गुन्हे म्हणजे नाशिकमधील प्रशासकीय ढिसाळपणा, राजकीय संरक्षण आणि यंत्रणांच्या अपयशाचे तीन आरसे आहेत.

**भोंदूबाबा अशोक खरात श्रद्धेचे शस्त्र**

मार्च २०२६ मध्ये नाशिक ग्रामीण पोलिसांनी अशोक खरात याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक केली आणि नाशिकच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरला. स्वयंघोषित ज्योतिषी, दैवी शक्तींचा दावेदार, फार्महाऊसवर यज्ञ-होम करणारा हा 'बाबा' प्रत्यक्षात एक कसलेला गुन्हेगार होता. महिलांची धार्मिक श्रद्धा, भविष्याची भीती आणि नातेसंबंधांतील अडचणी यांचा गैरफायदा घेत त्याने अनेक महिलांवर अत्याचार केले. तपास पथकाला अशोक खरातच्या मोबाईलमधून हवाला रॅकेटशी संबंधित धागेदोरे सापडले. त्याच्या फार्महाऊसवर चक्क १२ वर्षांपूर्वी दिलेल्या शस्त्र परवान्याखाली ठेवलेली काडतुसे आढळली त्यातील पाच वापरलेली होती. जानेवारी २०२४ मध्ये या परवान्याचे नूतनीकरणही करण्यात आले होते. एका भोंदूबाबाला शस्त्र परवाना कोणी दिला, का दिला हे प्रश्न नाशिक जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करतात. परंतु या प्रकरणातील सर्वात गंभीर पैलू म्हणजे खरातचे राजकीय कनेक्शन. अटकेनंतर सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोंनी सर्वपक्षीय नेत्यांचे त्याच्याशी असलेले संबंध उघड केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे सुनील तटकरे अक्षरशः सर्व पक्षांच्या नेत्यांसोबत त्याचे फोटो होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या नावाचाही उल्लेख झाला. महिलांचे रक्षण करण्याची शपथ घेतलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षच जर महिला अत्याचार करणाऱ्याशी जवळीक बाळगत असतील, तर व्यवस्था नेमकी कोणासाठी काम करते? राजकीय संरक्षणाच्या जाळ्यात अडकलेल्या या प्रकरणात न्याय किती खोलवर जाईल, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

टीसीएस-निदा खान प्रकरणात कार्यालय बनले अत्याचाराचे अड्डे

'टीसीएस' म्हणजे देशातील सर्वात मोठ्या आयटी कंपन्यांपैकी एक टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस. नाशिकमधील टीसीएस बीपीओ कार्यालयात एप्रिल २०२६ मध्ये उघडकीस आलेला घोटाळा देशाला अवाक् करणारा होता. कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांवर लैंगिक छळ, मानसिक यातना आणि धर्मांतराची सक्ती केल्याचे गंभीर आरोप निदर्शनास आले. हे आरोप २०२२ ते २०२६ या चार वर्षांच्या कालावधीतील होते. नाशिक पोलिसांनी एसआयटी स्थापन केली आणि सहा महिला पोलीस अधिकाऱ्यांना ४० दिवस कर्मचारी म्हणून कार्यालयात गुप्तपणे तैनात केले. तपासात नऊ एफआयआर नोंदवण्यात आल्या. पोष समितीचा एक सदस्य असताना त्याने तोंडी तक्रार ऐकूनही कार्यवाही न केल्याचा ठपका त्याच्यावर आहे. पोष म्हणजे कार्यस्थळावरील महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध आणि निवारण कायदा, २०१३. ९ डिसेंबर २०१३ रोजी कायदा अंमलात आला. या प्रकरणाची मुख्य आरोपी निदा खान ही मात्र २५ मार्चपासून फरार होती. ७ मे २०२६ रोजी नाशिक पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून तिला अटक केली. निदा खानवर महिलांचा लैंगिक छळ, मानसिक यातना आणि इस्लाममध्ये धर्मांतरास भाग पाडल्याचे आरोप आहेत. ही घटना केवळ गुन्ह्याची नाही, ती कार्यालयीन व्यवस्थेच्या ढासळण्याचीही आहे. पोष कायद्यांतर्गत प्रत्येक कार्यालयात तक्रार समिती असणे बंधनकारक आहे, परंतु ती केवळ कागदावरच राहते हे या प्रकरणाने सिद्ध केले.

**नीट पेपरफुटी परीक्षा केंद्रातूनच फुटला पेपर**

३ मे २०२६ रोजी देशभरात नीट-युजी परीक्षा झाली आणि केवळ काही दिवसांतच ती रद्द करण्याची नामुष्की केंद्र सरकारवर आली. या लीकचे पहिले कनेक्शन नाशिकशी होते. तपासकर्त्यांनुसार, लीक झालेल्या पेपरची पहिली प्रत नाशिकमध्ये तयार करण्यात आली. तेथून ती हरयाणाला पाठवण्यात आली, जिथे पाच वेगळे सेट तयार केले गेले. प्रत्येक सेटच्या १० प्रती. हे पेपर पुढे बिहार, आंध्र प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि राजस्थानमध्ये पसरले. राजस्थान पोलिसांनी दावा केला की पेपर नाशिकहून हरयाणामार्गे राजस्थानला पोहोचला.

# पान १ वरुन...

नक्षलवाद मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आला असून गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात विकासाची नवी दिशा निर्माण झाली आहे. आज जिल्ह्यात उद्योग, रस्ते, इंटरनेट सुविधा, आरोग्य सेवा आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून दुर्गम भाग मुख्य प्रवाहाशी जोडले जात आहेत.

गडचिरोलीत हजारो कोटींची गुंतवणूक

कोनसरी येथे लॉयड मेटल्स लिमिटेडसोबत २० हजार कोटी रुपयांच्या 'इंटिग्रेटेड स्टील प्लांट'साठी सामंजस्य करार करण्यात आला असून, त्यातून सुमारे १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. याशिवाय सुरजागड इस्पातच्या माध्यमातून आणखी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून सुमारे ८ हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे.

समृद्धी महामार्गाशी सुरजागडची जोडणी

सुरजागड परिसरातील खनिज वाहतुकीसाठी ८५ किलोमीटरच्या ग्रीनफिल्ड रस्ते प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येणार असून मुंबई ते गडचिरोली प्रवास ९ ते १० तासांमध्ये पूर्ण होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच गडचिरोलीत नवीन विमानतळ उभारण्यासही मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

**'डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट'मधून मोठी रोजगारनिर्मिती**

गडचिरोलीत आयोजित 'डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट-२०२५'मध्ये १२ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. यामधून १७,४३१ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे १.४४ लाख रोजगार निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई आणि एमएमआरला जागतिक आर्थिक केंद्र बनवण्याचा संकल्प

मुंबई हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' असून संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आर्थिक क्षेत्र बनवण्याचे सरकारचे ध्येय आहे.

नीती आयोगाने दिलेल्या रोडमॅपनुसार मुंबईचा जीडीपी दुप्पट करण्यासाठी आणि मुंबईला 'ग्लोबल फिनटेक कॅपिटल' बनवण्यासाठी राज्य सरकार वेगाने काम करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**४ लाख कोटींच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती**

एमएमआरमध्ये सध्या जवळपास ४ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू आहेत. अटल सेतू, कोस्टल रोड, बुलेट ट्रेन, मेट्रो विस्तार, दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे, मेट्रो लाईन-३ आणि वाढवण बंदर हे राज्याच्या भविष्यासाठी गेमचेंजर प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

**'६० मिनिटांची मुंबई' हे लक्ष्य**

मुंबईतील वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीम विकसित केली जात आहे. मुंबईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ६० मिनिटांत पोहोचता आले पाहिजे, हे लक्ष्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमएमआरमध्ये ३३७ किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारले जात असून मेट्रो लाईन्स २बी, ४, ५, ६, ७ए, ९ आणि १२ मुळे शहरी वाहतुकीत मोठा बदल होणार आहे.

**सॅटेलाईट शहरांना स्वयंपूर्ण आर्थिक केंद्र बनवणार**

कल्याणला लॉजिस्टिक्स हब, डोंबिवलीला नॉलेज आणि सर्व्हिस सेक्टर हब, अंबरनाथला औद्योगिक आणि एमएसएमई हब तर बदलापूरला शाश्वत नागरी विकासाचे मॉडेल बनवले जात आहे. सॅटेलाईट शहरांना केवळ निवासी विस्तार न ठेवता रोजगार, उद्योग आणि आधुनिक सुविधांनी युक्त स्वयंपूर्ण आर्थिक केंद्र बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**गृहनिर्माण क्षेत्रात मोठे बदल**

मुंबईत १२ लाख आणि एमएमआरमध्ये २० लाख घरांची गरज लक्षात घेऊन सरकारने १७ वर्षांनंतर नवीन गृहनिर्माण धोरण लागू केले आहे. माय होम - माय राईट या संकल्पनेतून २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरे उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

**डिजिटल हाऊसिंग पोर्टल आणि क्लस्टर पुनर्विकास**

एआय आधारित केंद्रीकृत डिजिटल हाऊसिंग पोर्टल विकसित करण्यात येत असून, त्यामध्ये जिओ-टॅगिंग, लँड बँक, महारेरा, महाभूलेख आणि पीएम गतिशक्ती यांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. क्लस्टर रीडेव्हलपमेंट आणि पुनर्विकास प्रकल्पांना प्राधान्य देत प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**'स्लम फ्री' मुंबईसाठी विशेष अभियान**

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'च्या माध्यमातून मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली जात आहे. नेत्रम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपग्रह डेटा, जीआयएस मॅपिंग आणि डिजिटल पाळत ठेवून नवीन अतिक्रमणे रोखली जाणार आहेत. धारावी पुनर्विकास हा जगातील सर्वात मोठ्या आधुनिक पुनर्विकास प्रकल्पांपैकी एक ठरणार असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पात्र आणि अपात्र नागरिकांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना राबवल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले.

**पर्यावरणपूरक विकासावर भर**

समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, मुंबई-पुणे मिसिंग लिंक आणि ठाणे-बोरीवली टनेल यांसारख्या प्रकल्पांमध्ये पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन करण्यात आले आहे.

सेंट्रल पार्क आणि नमो गार्डन्स

महालक्ष्मी रेसकोर्स येथे २९५ एकरांचे सेंट्रल पार्क विकसित केले जात असून ते देशातील सर्वात मोठ्या शहरी हरित क्षेत्रांपैकी एक असेल. ठाण्यात २५ एकरांचे 'नमो ग्रँड सेंट्रल पार्क' विकसित करण्यात आले आहे. याशिवाय राज्यभरात ३९४ 'नमो गार्डन्स' उभारले जात आहेत.

**हवामान बदलांशी लढण्यासाठी विशेष उपाययोजना**

पूर नियंत्रणासाठी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, पंपिंग स्टेशन, आयफ्लोज प्रणाली, डिवॉटरिंग पंप आणि मिठी नदी सुधारणा प्रकल्प राबवले जात आहेत. खारफुटी आणि पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन करत क्लायमेट रेझिलियन्स प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाचा भाग बनवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन मांडला. मुंबईसारख्या आर्थिक केंद्रासोबतच गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांनाही उद्योग, रोजगार, रस्ते, शिक्षण आणि आधुनिक सुविधांशी जोडण्याचे काम सरकार करत असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणून महाराष्ट्राला देशाच्या प्रगतीचे नेतृत्व करणारे राज्य बनविण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## देऊळगाव राजा....

गोवंश आढळून आल्याचा दावा कार्यकर्त्यांनी केला.

घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची गर्दी जमा झाली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यानंतर दोन्ही वाहने तसेच जनावरे चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली. पोलिसांनी वाहने आणि जनावरांची पाहणी करून संबंधित कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे.

कत्तलीसाठी वाहतूक केल्याचा आरोप

या संदर्भात माध्यमांशी बोलताना बजरंग दलाचे कार्यकर्ते अर्जुन डहाळे यांनी सांगितले की, दोन्ही वाहनांमधून मिळून अंदाजे पाच ते सहा जनावरांची वाहतूक केली जात होती. ही जनावरे जालना शहरातील कत्तलखान्याकडे नेली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. गोवंश संरक्षणासंदर्भातील कायद्यांचे उल्लंघन करून ही वाहतूक होत असल्याचा दावा करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू कारवाईनंतर दोन्ही वाहने आणि जनावरे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली असून, संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. पोलिसांकडून वाहनांची मालकी, वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या, जनावरांची खरेदी-विक्रीसंदर्भातील कागदपत्रे तसेच वाहतुकीचा उद्देश यांची पडताळणी केली जात आहे. तपासानंतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जप्त करण्यात आलेली जनावरे सुरक्षिततेच्या दृष्टीने गौशाळेत हलविण्यात येणार असल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली. प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप अर्जुन डहाळे यांनी यावेळी बोलताना प्रशासनावरही टीका केली. गोवंश कत्तल आणि अवैध वाहतुकीच्या विरोधात बजरंग दलाच्या वतीने यापूर्वी अनेकदा जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदने देण्यात आली आहेत. मात्र अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. अशा प्रकारच्या घटनांवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. 'यापुढेही कारवाई सुरूच राहील' गोवंश कत्तलीसाठी किंवा अवैधरीत्या वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यास बजरंग दल आणि गोरक्षक दलाच्या वतीने यापुढेही अशाच प्रकारच्या कारवाया केल्या जातील. गोवंश संरक्षणासाठी आम्ही सतत सजग राहणार आहोत, असा इशारा अर्जुन डहाळे यांनी यावेळी दिला. पोलीस तपासाकडे लक्ष या संपूर्ण प्रकरणी चंदनझिरा पोलीस अधिक तपास करत असून, वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे वैध होती की नाही, वाहतूक कोणत्या उद्देशाने केली जात होती आणि कायद्याचे उल्लंघन झाले आहे का, याचा तपास सुरू आहे. पोलिसांच्या तपासानंतरच या प्रकरणाचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार असून संबंधितांवर कोणती कारवाई होते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## एसपी तेघबीर सिंह...

आला होता. ही माहिती अत्यंत विश्वासार्ह असल्याने पोलीस अधीक्षक श्री. संधू यांनी तात्काळ हसनाबाद पोलीस ठाण्याला कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. पोलिसांनी लतीफपूर परिसरात गुप्त पाळत ठेवून संशयिताच्या हालचालींवर बारकाईने लक्ष केंद्रित केले.

शनिवारी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचून संशयिताला घेराव घातला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क पोलिसांनी त्याला तत्काळ ताब्यात घेतले. त्यानंतर करण्यात आलेल्या अंगझडतीत त्याच्याकडे एक गावठी पिस्तुल व एक मॅग्झिन आढळून आले. पोलिसांनी हे अग्नीशस्त्र तात्काळ जप्त करून आरोपीला अटक केली. पोलिसांनी जप्त केलेल्या गावठी पिस्तुल व मॅग्झिनची अंदाजे किंमत २५ हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

आरोपीविरुद्ध हसनाबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १५३/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ तसेच भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सखाहरी तायडे करीत असून, आरोपीकडे शस्त्र कोठून आले, त्याचा वापर कोणत्या उद्देशासाठी केला जाणार होता तसेच त्याच्या इतर साथीदारांचा सहभाग आहे का, याचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि भोकरदन विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत हसनाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, पोउपनि सखाहरी तायडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सागर देवकर, पोलीस कॉन्स्टेबल निलेश खराट, दीपक सोनुने, भाऊसाहेब पवार, उमेश पवार आणि नारायण चरावंडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाया सुरू असून, हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवरही विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. हद्दपार असतानाही शस्त्र बाळगून फिरणाऱ्या आरोपीला अटक झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, हसनाबाद पोलिसांच्या या धाडसी कारवाईचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

**हद्दपार असतानाही जिल्ह्यात प्रवेश; पोलिसांच्या जाळ्यात अडकला**

जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेल्या शेख जुनेद शेख आरेफ याने आदेशाचे उल्लंघन करून लतीफपूर येथे प्रवेश केला होता. त्याच्याकडे अग्नीशस्त्र असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करून त्याला गावठी पिस्तुल आणि मॅग्झिनसह अटक केली. या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये पोलिसांविषयीचा धाक अधिक वाढला असल्याचे मानले जात आहे.

## पिक्स आर्ट...

नोकरी लावण्याच्या बहाण्याने ४ लाख रुपये उकळल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेला खालील मुद्देमाल जप्त केला आहे: रोख रक्कम: १,४५,०००/- रुपये (१ लाख ४५ हजार)

वाहन: १,४०,०००/- रुपये किमतीची पल्सर मोटारसायकल (गुन्ह्यात वापरलेली)

मोबाईल: २०,०००/- रुपये किमतीचे दोन अँड्रॉइड मोबाईल (ज्यावरून बनावट आदेश तयार करून पाठवले)

एकूण जप्त मुद्देमाल: ३,०५,०००/- रुपये

कामगिरी बजावणारे पोलीस पथक

सदरची कौतुकास्पद कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेन्द्र वाघ, जगदीश बावणे, कैलास खार्डे, निरंजन घुगे, रुस्तुम जैवाळ, अक्नुर धांडगे, कैलास चेके आणि सोपान क्षीरसागर यांच्या पथकाने केली आहे.

**पोलीस प्रशासनाचे आवाहन:**

कोणत्याही शासकीय विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून पैशांची मागणी करणाऱ्या दलालांना बळी पडू नका. शासकीय भरती ही अधिकृत प्रक्रियेद्वारेच होते. अशी फसवणूक होत असल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## मुख्य रस्त्यावरील....

अतिक्रमण हटाव मोहीम शांततेत पार पडली. मोहिमेत सहभागी झालेले पथक ही धडक कामगिरी अतिक्रमण प्रमुख बी. सी. राठोड यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने बजावली. या पथकात खालील अधिकारी व कर्मचारी सक्रिय होते:

शामसन कसबे (सहाय्यक) अमजद खान (लिपिक तथा स्वच्छता निरीक्षक)

अजय पेम्बर्ती (लिपिक) शेख कादर (लिपिक)

आमेर खान (लिपिक) स्वच्छता विभागातील १० ते १२ सफाई कर्मचारी.

**स्वतःहून अतिक्रमण काढून घ्या, अन्यथा तीव्र कारवाई: मनपाचा इशारा**

या धडक कारवाईनंतर जालना शहर महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री. विजय फुलंब्रीकर यांनी नागरिकांना कडक शब्दांत आवाहन केले आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडी फोडणे आणि पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये म्हणून रस्ते व नाले मोकळे ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिक, व्यावसायिक आणि गृहधारकांनी आपल्या घरासमोरील किंवा दुकानासमोरील अनधिकृत अतिक्रमणे स्वतः हून काढून घ्यावीत. अन्यथा मनपा प्रशासनातर्फे यापुढेही अशीच तीव्र मोहीम राबवून अतिक्रमणे पाडली जातील आणि त्याचा खर्चही संबंधितांकडून वसूल केला जाईल. नागरिकांनी मनपा प्रशासनाला सहकार्य करावे.

- श्री. विजय फुलंब्रीकर
(सहाय्यक आयुक्त, जालना शहर महानगरपालिका)

महानगरपालिकेच्या या धडक कारवाईमुळे सुभद्रा नगर आणि वैद्यकीय महाविद्यालय रोड परिसराने मोकळा श्वास घेतला असून, मनपाच्या या भूमिकेचे जागरूक नागरिकांमधून स्वागत होत आहे.

## महावितरणच्या...

त्रुटी ठेवल्याबद्दल जबाबदार धरले. योगाने आपल्या अंतिम आदेशात म्हटले आहे की, अर्जदार रामेश्वर ईडाळकर यांची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. महावितरणने जुलै-२०२३ नंतर सरासरीप्रमाणे दिलेली सर्व वीज देयके रद्द करण्यात येत आहेत. अर्जदाराने जुलै-२०२३ नंतरच्या वीज वापरापोटी केवळ ११,००० रुपये आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत महावितरणकडे जमा करावेत. ही रक्कम भरल्यानंतर महावितरणने अर्जदाराला पुढील देयके दरमहा प्रत्यक्ष वीज वापराची नोंद घेऊनच द्यावीत, असे स्पष्ट निर्देश आयोगाने दिले आहेत. तसेच महावितरण ला तक्रारदाराला रक्कम रुपये १०००० झालेल्या त्रासा संदर्भात नुकसान भरपाई व रक्कम रुपये ५००० तक्रारीच्या खर्च असे एकूण रक्कम रुपये १५००० देण्याचे आदेश सुद्धा दिले. या निकालावर प्रतिक्रिया देताना अ‍ॅड. महेश धन्नावत म्हणाले, हा सामान्य ग्राहकाचा विजय आहे. वीज कंपन्या ग्राहकांना मनमानी पद्धतीने बिले देऊन त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आयोगाचा हा निर्णय श्री. ईडाळकर यांच्यासाठी मोठा दिलासा असून, अशा प्रकरणांमध्ये इतर ग्राहकांसाठी तो एक आशेचा किरण आहे. या निकालामुळे अवास्तव बिले पाठवणाऱ्या महावितरणच्या कारभाराला चांगलाच आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शेती कामांसाठी...

लक्षात घेऊन जिल्हाधिकारी श्रीमती आसिमा मित्तल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी आश्वासन दिले की, आज संध्याकाळपर्यंत या संदर्भात नवीन सुधारित आदेश काढण्यात येतील. कॅनमध्ये डिझेल मिळवण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक असतील: संबंधित शेतीनिगडित वाहनाचे आर.सी. बुक (RC Book) वाहन मालकाचे ओळखपत्र / आधार कार्ड ही कागदपत्रे पडताळून पाहिल्यानंतर शेतकऱ्यांना आणि वाहनधारकांना शेतीकामासाठी कॅनमध्ये डिझेल देण्याचे निर्देश पेट्रोल पंपांना दिले जातील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शिष्टमंडळातील प्रमुख उपस्थिती

या महत्त्वपूर्ण बैठकीत आणि निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने: राष्ट्रवादी किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष जगन्नाथ काकडे पाटील जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. सतीशजी टोपे ओबीसी सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. संजयजी काळबांडे प्रदेश सरचिटणीस नंदूभाऊ देशमुख माजी जि. प. सदस्य रामजी सावंत अंबड तालुकाध्यक्ष सतीशजी होंडे व राम शिरसाट बदनापूरचे माजी नगराध्यक्ष श्री. जऱ्हाड यांच्यासह श्री. अरुण पैठणे, संदीप खरात, जालना शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, माजी पंचायत समिती सदस्य गणेशराव कदम, भगवान नाईकनवरे, भारत कदम, नंदकुमार मुळे आणि श्रीहरी आनंदे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात असून, लवकरच आदेश निघाल्यानंतर डिझेलचा तुटवडा आणि रांगांचा त्रास कमी होईल अशी आशा आहे.

# ११ वर्षांनंतर 'देऊळ बंद २'ची ब्लॉकबस्टर एन्ट्री

## प्रदर्शित होताच प्रेक्षक झाले स्वामीमय गुरुवारी ब्रह्ममुहूर्तावर सकाळी साडेपाच वाजता थिएटरबाहेर गर्दी; शो हाऊसफुल्ल

२०१३ साली प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'देऊळ बंद' या चित्रपटाने मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत बॉक्स ऑफिसवर मोठा गाजावाजा केला होता. श्रद्धा विरुद्ध विज्ञान यांचा संगम असलेल्या या चित्रपटाने त्या काळात प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. तब्बल ११ वर्षांनंतर प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची' या बहुचर्चित सिक्वेलनेही प्रदर्शित होताच मराठी चित्रपटसृष्टीत ब्लॉकबस्टर एन्ट्री करत प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळवला आहे. पारंपरिक शुक्रवारऐवजी गुरुवारी सकाळी सहा वाजता, गुरुपुष्यामृत योग आणि ब्रह्ममुहूर्त साधत चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. विशेष म्हणजे, पहाटेच्या शोसाठीही प्रेक्षकांनी थिएटरमध्ये अक्षरशः गर्दी केली.राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये पहिल्याच दिवशी शो हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पुणे,



छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई

पिंपरी-चिंचवड, मुंबई, नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, जळगाव, विदर्भ आणि मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपट ब्लॉकबस्टर ठरत आहे. मुंबईतील मराठीबहुल भांडुप, कल्याण, नालासोपारा, अंधेरी, ठाणे आणि लोअर परळ परिसरातही 'देऊळ बंद २'ची प्रचंड क्रेझ पाहायला मिळाली. या भागातील अनेक थिएटरचे सर्व शो हाऊसफुल्ल झाले असून, तिकीट खिडक्यांवर गर्दी झाली आहे. 'बुक माय शो' या ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्मवरही तिकिटांसाठी मोठी झुंबड उडाल्याचे दिसून आले. सोशल मीडियावरही 'देऊळ बंद २'ची जोरदार चर्चा रंगली असून, प्रेक्षकांनी चित्रपटातील संवाद, दमदार कथानक, भावनिक प्रसंग, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले आहे. या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक प्रवीण विठ्ठल तरडे यांनी केले आहे. त्यांच्या वास्तववादी मांडणीमुळे आणि प्रभावी लेखनशैलीमुळे चित्रपट अधिक प्रभावी ठरला आहे.

चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी पुन्हा एकदा स्वामी समर्थांच्या दैवी भूमिकेत झळकले असून, त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष दाद मिळत आहे. त्यांच्या प्रभावी संवादफेकीतून आणि भावनिक अभिनयातून श्रद्धेची ताकद प्रभावीपणे प्रकट होताना दिसते. वटवृक्ष इंटरटेनमेंट निर्मित या भव्य चित्रपटाची निर्मिती कैलास वाणी, सौ. जयश्री वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. उत्कृष्ट छायांकन, प्रभावी पार्श्वसंगीत आणि भव्य सादरीकरणामुळे चित्रपट अधिक उठावदार ठरला आहे. प्रदर्शित होताच मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे 'देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची' हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील यंदाचा सर्वाधिक चर्चेत असलेला आणि संभाव्य ब्लॉकबस्टर चित्रपट ठरणार असल्याची चर्चा चित्रपट वर्तुळात सुरू झाली आहे. पहिल्याच दिवशी संपूर्ण महाराष्ट्रातील ५०० सिनेमागृहांमध्ये चित्रपटाचे २ हजारांहून अधिक शो प्रदर्शित झाले.

पुण्यातील सिटी प्राईड मल्टिप्लेक्समध्ये 'देऊळ बंद २'चे तब्बल २५ शो हाऊसफुल्ल झाले आहेत. एका मराठी चित्रपटाला मिळालेला हा प्रतिसाद विक्रमी मानला जात असून, चित्रपटाच्या लोकप्रियतेची जोरदार चर्चा सुरू आहे.

दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत चित्रपट प्रदर्शित करताना मध्यरात्रीचे शो, विशेष मुहूर्त किंवा पारंपरिक दिवसांऐवजी वेगळ्या दिवशी रिलीज करण्याचे प्रयोग केले जातात. त्याच धर्तीवर 'देऊळ बंद २' हा चित्रपट पारंपरिक शुक्रवारऐवजी थेट गुरुवारी ब्रह्ममुहूर्तावर प्रदर्शित करण्यात आला. विशेष म्हणजे, या प्रयोगालाही प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत थिएटरमध्ये प्रचंड गर्दी केली आणि मराठी सिनेमातील सर्वात चर्चित व दमदार ओपनिंगपैकी एक ओपनिंग चित्रपटाला मिळाल्याची चर्चा रंगली आहे.

# शेतकरी डिझेलसाठी रांगेत, सरकारचे दावे हवेत; ठाकरे गटाच्या महिला जिल्हाध्यक्षा रूपम घुगे यांचा संतप्त सवाल

## शेतकरी टिकला तर देश टिकेल; मग शेतकऱ्यांनाच डिझेलसाठी भटकंती का?- रूपम घुगे

**जालना । प्रतिनिधी**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून संपूर्ण जगभरात ओळखला जातो. शेतकरी टिकला तरच देश टिकेल. मात्र आज खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नाही, ही अत्यंत गंभीर परिस्थिती आहे,'' असा घणाघाती आरोप ठाकरे गटाच्या महिला जिल्हाध्यक्षा रूपम घुगे यांनी केला आहे.राज्यात अनेक ठिकाणी डिझेल-पेट्रोल टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र आहे. यावर प्रतिक्रिया देताना रूपम घुगे म्हणाल्या की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात इंधनाचा पुरेसा साठा असल्याचे वक्तव्य केले होते. मग प्रत्यक्षात शेतकऱ्यांना लाईनमध्ये का उभे राहावे लागत आहे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.पहिला पाऊस सुरू होण्याच्या तोंडावर शेतकरी शेत मशागतीच्या तयारीत आहेत. ट्रॅक्टर, पंप आणि शेतीची इतर यंत्रणा चालवण्यासाठी डिझेल अत्यावश्यक असताना शेतकऱ्यांना वेळेवर इंधन मिळत नसल्याने मोठा संताप व्यक्त होत आहे. ''आज आपण दोन वेळच्या जेवणासाठी शेतकऱ्यावर अवलंबून आहोत. मात्र त्याच शेतकऱ्याला डिझेलसाठी भटकावे लागत असेल तर ही शासनासाठी लाजिरवाणी बाब आहे,'' असेही घुगे म्हणाल्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थिती नियंत्रणात येण्यासाठी ३० जूनपर्यंतची



मुदत दिली होती. यावरही रूपम घुगे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ''जर परिस्थिती इतकी गंभीर होती तर उपाययोजना आधी का करण्यात आल्या नाहीत? ३० जूनची वाट का पाहिली जात आहे?'' असा सवाल केला.जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी कॅनमध्ये डिझेल देण्यास बंदी घालण्याच्या निर्णयावरही त्यांनी टीका केली. ''शेतकरी अनेकदा शेतात असतो. प्रत्येक वेळी ट्रॅक्टर घेऊन पंपावर जाणे शक्य नसते. मग कॅनमध्ये डिझेल मिळाले नाही तर शेतकऱ्यांनी शेतीची कामे कशी करायची?'' असा प्रश्न त्यांनी प्रशासनासमोर उपस्थित केला.शासनाने तातडीने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल पुरवठा व्यवस्था करावी, ग्रामीण भागातील पंपांवर विशेष सुविधा द्याव्यात आणि खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही रूपम घुगे यांनी केली आहे.

# इंधन साठ्याबाबत अफवांवर विश्वास ठेवू नका; तहसीलदार सुमन मोरे यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेली संभ्रमावस्था दूर करण्यासाठी, मंठा येथील तहसीलदार सुमन मोरे यांनी तालुक्यातील विविध पेट्रोल पंपांना भेटी देऊन सद्यस्थितीचा आढावा घेतला. तालुक्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल- डिझेलच्या उपलब्धतेबाबत नागरिकांमध्ये किरकोळ चर्चा आणि चिंता निर्माण झाली होती. नागरिकांची हीच गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना दिलासा देण्यासाठी



तहसीलदार सुमन मोरे यांनी पुरवठा विभागाच्या पथकासह विविध इंधन केंद्रांची पाहणी केली.साठा आणि वितरणाची प्रत्यक्ष पाहणी या भेटीदरम्यान तहसीलदार आणि त्यांच्या पथकाने पेट्रोल पंपांवरील उपलब्ध साठ्याची () माहिती घेतली. तसेच, ग्राहकांना नियमितपणे आणि सुरळीतपणे इंधन मिळत आहे की नाही, याचीही खात्री केली. सर्व प्रमुख पंपांवर इंधनाचा पुरवठा वेळेवर होत असल्याचे यावेळी दिसून आले. नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन सद्यस्थितीबाबत माहिती देताना तहसीलदार सुमन मोरे म्हणाल्या,''तालुक्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा पुरेसा आहे.

पुरवठा साखळी नियमित सुरू असून नागरिकांनी आवश्यकतेपेक्षा जास्त इंधन खरेदी करण्यासाठी पंपांवर गर्दी करू नये. कोणत्याही प्रकारची टंचाई भासणार नाही याची प्रशासन पूर्ण काळजी घेत आहे.''पंप चालकांना सहकार्याचे आवाहन प्रशासनाने सर्व पेट्रोल पंप चालकांना ग्राहकांना विनाकारण वाट पाहावी लागणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना केली आहे. तसेच, उपलब्ध साठा आणि दराची माहिती नागरिकांना सहज दिसेल अशा रितीने लावण्यास सांगितले आहे, जेणेकरून ग्राहकांमध्ये पारदर्शकता राहील.तहसीलदार सुमन मोरे यांनी स्वतः पुढाकार घेऊन केलेल्या या पाहणीमुळे नागरिकांमधील संभ्रम दूर झाला असून, तालुक्यातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत व शांततेत सुरू आहे.

# अंबड तालुक्यात डिझेल साठे बाजी करणाऱ्यांची खैर नाही!

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यामध्ये अवैध रित्या पेट्रोल आणि डिझेलची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर प्रशासनाने आज, दिनांक २३ मे २०२६ रोजी धडक कारवाई केली आहे. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण आणि तालुका पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त केले आहे.

तालुक्यात काही ठिकाणी विनापरवाना व अवैध पद्धतीने इंधनाचा साठा करून त्याची चढ्या दराने विक्री होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे महसूल व पुरवठा विभागाने तातडीने पथके तयार करून आज विविध ठिकाणी अचानक तपासणी मोहीम



राबवली. या ठिकाणी झाली कारवाई व जप्ती: या धडक मोहिमेदरम्यान खालील ठिकाणांवरून अवैध डिझेल साठा जप्त करण्यात आला: स्वामी समर्थ किराणा दुकान (कानडगाव, ता. अंबड): येथे तपासणी दरम्यान १० लिटर अवैध डिझेल मिळून आले. अर्जुन झेरॉक्स अँड मल्टि सर्विसेस (चिंचखेड, ता. अंबड): या ठिकाणी छापा टाकून ४० लिटर डिझेल जप्त करण्यात आले.स्वामी समर्थ नाश्ता सेंटर (शहापूर, ता. अंबड): या हॉटेलवर केलेल्या कारवाईत सर्वाधिक ५० लिटर अवैध डिझेल साठा हस्तगत करण्यात आला.

महत्त्वाची नोंद: आजच्या या संपूर्ण कारवाईमध्ये एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त करण्यात आले असून, संबंधितांवर नियमानुसार पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अवैध विक्रेत्यांना प्रशासनाचा इशारा: अशा प्रकारे विनापरवाना आणि असुरक्षित रित्या पेट्रोल-डिझेलसारख्या ज्वलनशील पदार्थांचा साठा करणे हा गंभीर गुन्हा असून, यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

''अंबड तालुक्यात अवैध रित्या इंधन साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. आज झालेली कारवाई ही केवळ सुरुवात असून, तालुक्यात ही धडक मोहीम आणि कारवाई यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहील.''

**विजय चव्हाण (तहसीलदार, अंबड) / किरणकुमार खांडेभराड (तालुका पुरवठा अधिकारी)**

तालुक्यातील नागरिकांनी किंवा व्यापाऱ्यांनी अशा प्रकारच्या अवैध इंधन साठवणुकीपासून दूर राहावे, अन्यथा कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रुपांतर करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई। वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.



**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे: एम.डी. सायकिअॅट्री

एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी

एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क

डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

नागपूर येथे एम.डी. सायकिअॅट्रीला सुरुवात

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

# जागतिक हवामान खात्याचे भाकीत खरे ठरत आहे

यावर्षीचा उन्हाळा हा आजवरचा सर्वात कडक उन्हाळा समजला जात आहे. यावर्षी सर्वच शहरांचे तापमान ४२ अंशाच्या पुढे गेले आहे काही शहरांचे तापमान तर ४५ ते ४७ अंशाच्या घरात आहे. वाढत्या तापमानाने देशातील जनता हैराण झाली आहे. उष्णता वाढल्याने उष्माघात होऊन अनेकांचे प्राणही गेले आहेत. केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात हीच परिस्थिती आहे याला कारण आहे ते म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान मर्यादित पातळीपेक्षा जास्त वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंग ही समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची ही समस्या दरवर्षी वाढत जाईल असे भाकीत जागतिक हवामान खात्याच्या संशोधकांनी काही वर्षापूर्वी व्यक्त केले होते ते खरे होताना दिसत आहे. जागतिक हवामान खाते ( डब्लूएमओ ) ही संयुक्त राष्ट्र संघटनेची एक संघटना असून ती जागतिक हवामानावर संशोधन करते. या संस्थेच्या संशोधकांनी १८५० ते १९०० या ५० वर्षाच्या कालखंडातील तापमामाच्या सरासरीचा आणि त्यानंतरच्या कालखंडाच्या सरासरी तापमानाचा तुलनात्मक अभ्यास करून हे भाकीत वर्तवले होते. १८५० ते १९०० या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली नव्हती त्यामुळे कोळसा, गॅस आणि तेल यांच्या वापरास सुरवात झाली नव्हती. मात्र त्यानंतरच्या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली आणि जेंव्हा पासून औद्योगिकीकरणास सुरवात झाली तेंव्हापासून पृथ्वीच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाल्याचा निष्कर्ष या संस्थेच्या संशोधकांनी काढला होता. औद्योगिकरणास सुरवात झाल्यापासून म्हणजेच विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पृथ्वीचे तापमान वाढण्यास सुरवात झाली असून यापुढे जागतिक तापमान अधिक वेगाने वाढणार असल्याचा निष्कर्ष या संशोधकांनी काढला होता. या निष्कर्षानुसार २०२७ पर्यंत म्हणजे पृथ्वीचे तापमान दीड डिग्रीने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. ही शक्यता ६६ टक्के संशोधकांनी वर्तवली होती. संशोधकांनी वर्तवलेले हे भाकीत खरे होताना दिसत आहे.

यावर्षी मागील वर्षापेक्षाही अधिक आहे. जागतिक हवामान खात्याने वर्तवलेले हे भाकीत खरे ठरत आहे. पृथ्वीचे तापमान वाढत असल्याचे मोठे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत जाणार असल्याने युरोप, अमेरिकासह आशिया खंडात उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादळांची तीव्रता वाढेल. वनव्यांचे प्रमाण वाढेल. ज्या भागात पावसाची गरज आहे त्या भागात पाऊस न पडता अन्य भागात पाऊस पडेल. पावसाचे प्रमाण कमी होईल. अतिउष्णतेमुळे हिमनद्या वितळतील. त्यामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होईल परिणामी पूर येतील. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगल प्रजातींवर परिणाम होईल.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगलांना आगी लागतील या आगीत अनेक पशुपक्षी व प्राणी मरण पावतील एकूणच ग्लोबल वॉर्मिंगचा फटका केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीलाच बसेल. अर्थात याला आपणच म्हणजे मानवच जबाबदार आहे. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभी केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन वाढवले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. अर्थात अजूनही वेळ गेलेली नाही. अजूनही आपण ग्लोबल वॉर्मिंगला थोपवू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे ग्रीनहऊस वायूंचे उत्पादन कमी करणे. जीवष्म इंधनाऐवजी इतर इंधन स्रोत वापरणे. झाडे लावून ती जगवली पाहीजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गात मानवाने केलेला हस्तक्षेप थांबवला पाहिजे. विकासाच्या नावाखाली होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखला पाहिजे या आणि अशाप्रकारच्या उपाययोजना करून आपण तापमानवाढ नियंत्रणात आणू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग रोखण्याची जबाबदारी मानवाची आहे. ही समस्या केवळ एका देशाची किंवा एक प्रदेशाची नसून ती जागतिक समस्या आहे म्हणून ग्लोबल वॉर्मिंग रोखण्यासाठी जागतिक समुदायाने देखील कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# निवडणूक कामात हलगर्जीपणा महागात.. शिक्षकाविरुद्ध थेट गुन्हा दाखल

## वारंवार सूचना, नोटीस तरीही कामात प्रगती नाही; तहसील प्रशासनाची कठोर कारवाई

**भोकरदन । प्रतिनिधी**

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण () मोहिमेतील कामात गंभीर निष्काळजीपणा व अडथळा निर्माण केल्याप्रकरणी भोकरदन तहसील प्रशासनाने एका मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याविरुद्ध थेट गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू केल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.नायब तहसीलदार (निवडणूक) शहानवाज आसिफ पठाण यांनी भोकरदन पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार,सुंदरवाडी येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहायक शिक्षक युवराज साहेबराव जाधव यांनी निवडणूक आयोगाच्या अत्यंत महत्त्वाच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिमेकडे सातत्याने दुर्लक्ष केले.मिळालेल्या माहितीनुसार,भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीतील मतदारांचे मॅपिंग करण्यासाठी तहसील कार्यालयात प्रशिक्षण, बैठका,सूचना तसेच व्हॉट्सअॅपद्वारे वारंवार संपर्क करण्यात आला होता. मात्र संबंधित अधिकारी वारंवार गैरहजर राहिले. इतकेच नव्हे तर कारणे दाखवा नोटीस बजावूनही समाधानकारक खुलासा सादर करण्यात आला नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.विशेष म्हणजे सुंदरवाडी मतदान भागात एकूण ८२१ मतदार असताना केवळ २८५ मतदारांचेच मॅपिंग पूर्ण झाले होते. म्हणजेच अवघी ३४.७१ टक्के कामगिरी झाल्याने प्रशासनाने ती गंभीर बाब मानली आहे.तहसील प्रशासनाच्या मते, वारंवार प्रशिक्षण,सूचना, विनंती आणि नोटीस देऊनही कामात कोणतीही सुधारणा दिसून आली नाही.त्यामुळे निवडणुकीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्याचा ठपका ठेवत लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३४ अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून निवडणूक कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर प्रशासन आता थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# पेट्रोल-डिझेल टंचाईवर मनसे आक्रमक; प्रशासन झोपले आहे का? - राहुल रत्नपारखे यांचा सवाल

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरासह मराठवाड्यात निर्माण झालेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. नागरिकांना पेट्रोल आणि डिझेल मिळत नसताना प्रशासन मात्र झोपेचे सोंग घेत आहे, असा आरोप त्यांनी केला.

रत्नपारखे म्हणाले की, जालना शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधनासाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. काही ठिकाणी डिझेल उपलब्ध नसल्याने शेतकरी, वाहनचालक आणि व्यापाऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. मात्र याकडे जालन्याच्या तहसीलदार छाया पवार यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कुठल्याही प्रकारचे कमांड किंवा नियोजन प्रशासनाकडून दिसत नाही, असेही ते म्हणाले.

पेट्रोल आणि डिझेल महाराष्ट्रात उपलब्ध आहे, मग फक्त मराठवाड्यातच टंचाई का निर्माण झाली? मुंबई आणि पुणे महाराष्ट्राच्या बाहेर आहेत का? असा उपरोधिक सवालही राहुल रत्नपारखे यांनी उपस्थित केला. पेट्रोल पंप मालकांची थकबाकी बाकी असल्यामुळे अनेक पंपांवर इंधनाचा पुरवठा होत नसल्याची माहिती समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी त्यांनी सर्व पेट्रोल पंप चालकांना इशाराही दिला. प्रत्येक पेट्रोल पंपावर डिझेल आणि पेट्रोलचा किती साठा उपलब्ध आहे, याचे बोर्ड तात्काळ लावावेत. नागरिकांना खरी माहिती दिली नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आंदोलनाचा मार्ग स्वीकारेल, असा इशारा राहुल रत्नपारखे यांनी दिला. मराठवाड्यातील इंधन टंचाईवर राज्य शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे.

# विधान परिषदेसाठी अभिमन्यूदादा खोतकर यांना संधी द्यावी - योगेश गणगे

**मंठ । प्रतिनिधी**



परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ हा पारंपरिकरित्या शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जात असून, या मतदारसंघातून युवासेनेचे महाराष्ट्र सचिव अभिमन्यूदादा खोतकर यांना विधान परिषदेची उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे पाटील यांनी केली आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात योगेश गणगे पाटील यांनी म्हटले आहे की, शिवसेनेच्या माध्यमातून मराठवाड्यात युवकांचे संघटन मजबूत करण्यासाठी अभिमन्यूदादा खोतकर यांनी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाची ताकद वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक युवक पक्षाशी जोडले गेले आहेत. राजकीय कार्यासोबतच अभिमन्यूदादा खोतकर यांनी सामाजिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या समस्या यांची त्यांना जवळून जाण असून, संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेकदा पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील युवकांना रोजगार आणि शेतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीही ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण मोहिमा राबवत युवा पिढीत जागरूकता निर्माण केली आहे. तसेच धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असून, विविध पदयात्रांमध्ये भाविकांसाठी अन्नदान, वैद्यकीय मदत आणि आवश्यक सुविधांचे आयोजन करण्यात त्यांनी योगदान दिले आहे.

युवासेनेचे सचिव म्हणून मराठवाड्यात युवकांचे संघटन बळकट करण्याबरोबरच त्यांना व्यसनमुक्ती, क्रीडा आणि सामाजिक कार्याकडे वळविण्याचे कार्य त्यांनी केले आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना गरजू नागरिक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठीही त्यांनी अनेक शिबिरे आयोजित केली आहेत. आरोग्य क्षेत्रातही गरीब रुग्णांना उपचारासाठी आर्थिक व प्रशासकीय मदत मिळवून देण्यात ते अग्रेसर राहिले आहेत. विधान परिषदेसारख्या महत्त्वाच्या सभागृहात मराठवाड्याचा दमदार आवाज पोहोचवण्यासाठी तसेच युवक, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अभिमन्यूदादा खोतकर यांच्यासारख्या अभ्यासू, कार्यक्षम आणि तळागाळाशी नाळ जोडलेल्या नेतृत्वाला संधी देणे आवश्यक असल्याचे योगेश गणगे पाटील यांनी नमूद केले. मराठवाड्यातील युवकांच्या अपेक्षा आणि भावना लक्षात घेऊन शिवसेना पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या नावाचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. रजनीश कामत

**सांगली । प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. राजनीश कमलाकर कामत यांचे मूळ गाव कागल (जि. कोल्हापूर) असून त्यांचा जन्म मिरज (जि. सांगली) येथे झाला. त्यांचे कुटुंब करवीर संस्थान आणि कोल्हापूरच्या सामाजिक-शैक्षणिक परंपरेशी निगडित आहे. त्यांचे आजोबा छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी वैद्य होते. त्यांचे काका डॉ. बाळकृष्ण कामत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कागल येथे त्यांच्या घरी मुक्काम केला होता. त्यांचे वडील कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात उपअधीक्षक पदावर कार्यरत होते.डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विज्ञान शाखेत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. दोन्ही पदव्यांमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. पुढे त्यांनी गोवा विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथे उच्च तांत्रिक प्रशिक्षण घेतले.गोवा, कोल्हापूर आणि सोलापूर येथील विद्यापीठांमध्ये सुमारे अठ्ठावीस वर्षांचा अध्यापनाचा अनुभव त्यांच्याकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित कार्यकारी बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, स्नायुरूपी संगणन, यंत्रशिक्षण, विद्युत परिपथ रचना आणि सायबर-भौतिक प्रणाली या विषयांमध्ये त्यांनी संशोधन कार्य केले आहे. त्यांनी तेवीसहून अधिक अभ्यासक्रम विकसित केले आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ येथे त्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांच्या सहकार्याने क्वांटम संगणन उत्कृष्टता केंद्र उभारण्याचे काम सुरू केले आहे. त्यांचे अनेक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले असून त्यांची १३ आंतरराष्ट्रीय पुस्तके प्रकाशित आहेत.संशोधनासाठी त्यांनी देश-विदेशांतून पंचवीस कोटी रुपयांहून अधिक निधी प्राप्त केला. पंतप्रधान उच्चतर शिक्षा अभियान, मनुष्यबळ विकास मंत्रालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आणि युरोपियन महासंघ यांच्या विविध प्रकल्पांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या एसईआरसी तरुण शास्त्रज्ञ जलदगती योजनेअंतर्गत त्यांना संशोधन अनुदान मिळाले.त्यांच्या नावावर ११ मंजूर स्वामित्व हक्क, १३ प्रकाशित आणि ४३ दाखल स्वामित्व हक्क (पेटंट) आहेत. यामध्ये जैव-पदार्थ आधारित मेंदू-प्रेरित संगणन साधन, स्मार्ट प्रकाश-संधारित्र साधन, कीटकनाशक शोध प्रणाली, आरोग्यसेवेसाठी महाकाय माहिती साधन आणि हस्तमुक्त स्मार्ट आवाज सहाय्यक साधन यांचा समावेश आहे. त्यांपैकी एका संशोधनाला युनायटेड किंग्डममध्ये रचना स्वामित्व हक्क प्राप्त झाला आहे.डॉ. कामत यांनी विविध विद्यापीठांमध्ये प्रशासकीय जबाबदाऱ्याही सांभाळल्या आहेत. २०२२ पासून ते डॉ. होमी भाबा राज्य समूह विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू म्हणून कार्यरत होते. त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे प्रभारी कुलगुरू म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. त्यांना तेरा वर्षांहून अधिक सांविधानिक प्रशासकीय अनुभव आहे.शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) मिळालेल्या मानांकन प्रक्रियेमध्ये त्यांनी अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक म्हणून मोलाचे योगदान दिले. निष्पत्ती आधारित शिक्षण, अध्ययन व्यवस्थापन प्रणाली, ३६० अंश अभिप्राय आणि गुणवत्ता प्रयोगशाळा या उपक्रमांमध्ये त्यांनी काम केले.आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांनी विविध संस्थांसोबत कार्य केले आहे.



ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियन तंत्रज्ञान संस्था येथे ते मानद प्राध्यापक आहेत. युरोपियन महासंघाच्या 'इरॅस्मस+' योजनेअंतर्गत त्यांनी बार्सिलोना, व्हॅलेन्सिया, सॅपिएन्झा, रोम आणि माद्रिद येथील संस्थांसोबत शैक्षणिक सहकार्य केले आहे. तैवान, जपान, मलेशिया, व्हिएतनाम आणि स्पेन येथे त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. भारतीय नौदलाच्या पाणबुडी डिजिटलीकरण प्रकल्पातही त्यांनी सल्लागार म्हणून काम केले आहे.समाजाभिमुख उपक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे.

गोवा विद्यापीठात त्यांनी पंचायत राज कार्यक्रमासाठी उपग्रहाधारित दूरशिक्षण केंद्र उभारले. ग्रामीण भागासाठी तंतूप्रकाश इंटरनेट सुविधा, आदिवासी भागांसाठी भूस्खलन पूर्वसूचना यंत्रणा आणि सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम राबवले. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या साहाय्याने दुर्मिळ ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटलीकरणाचे कामही त्यांनी केले.महाराष्ट्र शासनाने त्यांची विविध समित्यांवर नियुक्ती केली आहे. जिओ विद्यापीठ, पिल्लई विद्यापीठ, संजीवनी विद्यापीठ आणि एलार्ड विद्यापीठ यांच्या स्थापनेसाठीच्या सत्यापन समित्यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

सार्वजनिक ग्रंथालयांचे डिजिटलीकरण, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम सुधारणा, आदिवासी विद्यापीठ आणि ललित कला विद्यापीठ अभ्यासगटांमध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.डॉ. कामत यांनी होमी भाभा राज्य विद्यापीठात पंचवीस नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित केले. क्वांटम विज्ञान, क्रीडा प्रशिक्षण आणि व्यावसायिक कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारखे अभ्यासक्रम त्यांनी सुरू केले. राष्ट्रीय स्वयम् मंचासाठी त्यांनी ऑनलाइन शिक्षक पुनश्चर्या अभ्यासक्रम विकसित केला.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेले संशोधक विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये कार्यरत आहेत.त्यांना विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. अमेरिकन बौद्धिक संपदा कायदा संघटनेचा नेतृत्व पुरस्कार (२०२४), विज्ञान प्रसार पुरस्कार (२०२५), भारत रोजगारक्षम करणारा पुरस्कार (२०२५), जागतिक सायबर सुरक्षा पुरस्कार, सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार आणि टेक्सास उपकरण कंपनीचा प्राध्यापक मार्गदर्शन पुरस्कार यांचा त्यात समावेश आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियंते संस्थेचे साथीपदही त्यांना प्राप्त झाले आहे.

# जाफराबादमध्ये डिझेलसाठी शेतकऱ्यांची धावपळ; शेतकरी व वाहनधारक चिंतेत

**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील सर्वच पेट्रोल पंपावर कॅनमधून डिझेल देण्यास बंदी घालण्यात आल्याने गुरुवारी मोठा गोंधळ उडाला. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतीची कामे सुरू असतानाच डिझेल मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. डिझेलअभावी ट्रॅक्टर, पंपसेट आणि इतर शेती मशागतीची कामे ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

सकाळपासूनच शेतकरी ट्रॅक्टर, दुचाकी तसेच कॅन घेऊन पेट्रोल पंपावर दाखल होत होते. मात्र, कॅनमध्ये डिझेल देण्यास मनाई असल्याचे सांगण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. यामुळे पंप परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. काही ठिकाणी वाहनांच्या रांगा रस्त्यावर आल्याने वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तात्काळ बंदोबस्त देऊन परिस्थिती नियंत्रणात आणावी आणि शेतकऱ्यांना डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल-डिझेल पंपधारकांना महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. जिल्हाधिकारी

**स्वतंत्र व्यवस्था करण्याची मागणी**

सध्या खरीप हंगामाची कामे सुरू असून ट्रॅक्टर आणि पंपासाठी डिझेल अत्यंत गरजेचे आहे. मात्र पंपावर तासन्तास रांगेत उभे राहूनही डिझेल मिळत नाही. प्रशासनाने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करून पुरेशा प्रमाणात डिझेल उपलब्ध करून द्यावे, अन्यथा शेतीची कामे खोळंबतील.

**- असंख्य शेतकरी**

कार्यालयातून २२ मे २०२६ रोजी काढण्यात आलेल्या पत्रानुसार, खरीप हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना अधिकृत बॅरल किंवा कॅनमधून डिझेल उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना डिझेल देताना संबंधित ट्रॅक्टरचे आरसी बुक तसेच एग्रीस्टॅक आयडी



(Farmer ID) तपासणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याची स्वतंत्र नोंद रजिस्टरमध्ये

**नियमांचे पालन करून वितरण**

प्रशासनाच्या आदेशानुसारच आम्ही डिझेल वितरण करत आहोत. कॅनमधून डिझेल देताना शेतकऱ्यांची कागदपत्रे तपासणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे थोडा वेळ लागत असला तरी नियमांचे पालन करूनच डिझेल दिले जात आहे. काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनाने घेतलेला निर्णय योग्य आहे. नागरिकांनी सहकार्य करावे.

**- सर्व पेट्रोल पंप चालक**

ठेवावी लागणार आहे. एग्रीस्टॅक आयडी नसल्यास आधार कार्ड, मोबाईल क्रमांक, नाव व स्वाक्षरी घेऊन नोंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या नोंदींची तपासणी तहसीलदारांच्या पथकांकडून केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या सुविधेचा गैरवापर, काळाबाजार किंवा विक्री आढळल्यास साठेबाजी, अनधिकृत

**जिल्हाधिकाऱ्यांची नियमावली**

१ खरीप हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना अधिकृत बॅरल किंवा कॅनमधून डिझेल उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२ शेतकऱ्यांना डिझेल देताना ट्रॅक्टरचे आरसी बुक तसेच एग्रीस्टॅक आयडी तपासणे बंधनकारक असून नोंद रजिस्टरमध्ये ठेवावी लागेल.

३ एग्रीस्टॅक आयडी नसल्यास आधार कार्ड, मोबाईल क्रमांक, नाव व स्वाक्षरी घेऊन नोंद ठेवावी लागेल, ज्याची तपासणी तहसीलदार पथक करेल.

सुविधेचा गैरवापर, साठेबाजी किंवा काळाबाजार आढळल्यास अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ आणि पेसो नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल. असा इशारा प्रशासनामार्फत देण्यात आलेला आहे.

. दरम्यान, प्रशासनाच्या या निर्णयामुळे डिझेलटंचाईमुळे अडथळा निर्माण झालेल्या शेती कामांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.